बारामतीकरांना माझ्यासारखा आमदार मिळणार नाही - अजित पवार

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 08/04/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 76 || RNI - MAHMAR51259 || metrocity924@gmail.com



# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉ. सुश्रूत घैसास यांचा राजीनामा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरणात भिसे कुटुंबाने आरोप केला होता की दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी उपचारांआधी १० लाख रुपये इतकी अनामत रक्कम भरण्यासाठी अडवणूक केली होती. त्यामुळे डॉ. घैसास यांच्यावर टीका होत आहे. यामुळे डॉ. घैसास चौकशीच्या फेऱ्यात अडकले होते.

या चौकशीला कंटाळून घैसास यांनी त्यांच्या पदाचा राजीनामा दिल्याचं वृत्त समोर आलं आहे. आमदार अमित गोरखे यांच्यासह अनेकांनी यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत.


रुग्णालय प्रशासनाची बदनामी, रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची गैरसोय आणि चौकशीला कंटाळून डॉ. घैसास यांनी राजीनामा दिल्याचं सांगितलं जात आहे. त्यांनी आपला राजीनामा रुग्णालयाचे प्रमुख डॉ. धनंजय केळकर यांच्याकडे सुपूर्द केला आहे. केळकर हे काही वेळात पत्रकार परिषद घेऊन घडलेली घटना व घैसास यांच्या राजीनाम्याबद्दल बोलतील. अमित गोरखे म्हणाले, “भिसे कुटुंबाचं सुरुवातीपासून म्हणणं होतं की या दुर्दैवी मृत्यूला डॉ. घैसास जबाबदार आहेत. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय चांगलं काम करत आहे आणि पुढेही करेल. राज्य सरकारने व मंगेशकर कुटुंबाने ज्या उदात्त हेतूने हे रुग्णालय चालू केलं होतं. त्या हेतूला कुठेतरी काळीमा फासण्याचं काम डॉ. घैसास यांच्या कृतीने केला आहे.

त्यामुळे आमची मागणी होती की त्यांच्यावर गुन्हा दाखल करा. आज त्यांनी राजीनामा दिला आहे. याचाच अर्थ तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणात कुठेतरी घैसास यांना अपराधीपणा वाटत होता.

त्याच अपराधी भावेतून त्यानी राजीनामा दिला असावा. आपण कुठेतरी चुकलोय ही भावना त्यांच्या मनात आली असेल म्हणून त्यांनी राजीनामा दिला असावा.”

# "तनिषा भिसेंची हत्या,"; सुप्रिया सुळेंचा आरोप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पुणे : दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरण म्हणजे तनिषा भिसे यांची हत्या आहे, असा आरोप खासदार सुप्रिया सुळेंनी केला आहे. तसंच जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे अशीही मागणी त्यांनी केली आहे. तनिषा भिसे यांच्या मृत्यूची घटना दुर्दैवी आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाकडून हलगर्जीपणा झाला आहे. सत्ताधाऱ्यांचे हाल होत असतील तर सामान्य माणसांचं काय? मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून फोन गेल्यावरही मदत मिळत नसेल तर कुणाला न्याय मागायचा? या सरकारने याबाबत आत्मचिंतन केलं पाहिजे असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या. रुग्णालयावर कारवाई झालीच पाहिजे. माणुसकी आहे की नाही? अत्यंत दुर्दैवी आणि अस्वस्थ करणारी ही घटना आहे. आमची सरकारकडून अपेक्षा आहे की आता अहवाल आला आहे आणि रुग्णालयाची चूक आहे हे दिसतं. तनिषा भिसेंची हत्या झाली आहे त्यांना न्याय मिळाला पाहिजे. आता काय दहा समित्यांचा अहवाल येईपर्यंत वाट बघणार का? असाही सवाल सुप्रिया सुळेंनी केला आहे.

या सरकारने थोडासा संवेदनशीलपणा दाखवावा. भिसेंच्या दोन मुली आयसीयूत आहेत. देव त्यांना अडचणीच्या काळात ताकद देओत. मी भिसे कुटुंबासाठी भेट घेतली. त्यांच्या घरातली त्यांच्या घरातली बायको, मुलगी, सून असलेल्या तनिषा भिसेंवर अन्याय झाला आहे त्यांची हत्या झाली आहे. आता त्यांची लेक, सून यांना तर आम्ही परत आणू शकत नाही. भिसे कुटुंबाला मदतीसाठी, आधार देण्यासाठी आम्ही इथे आलो आहोत. त्या मुलीची तनिषाची हत्या झाली आहे. महाराष्ट्रातल्या कुठल्याही लेकीवर ही वेळ येऊ नये अशी आता आमची अपेक्षा आहे. तसंच त्या दिवशी नेमकं काय झालं? हे समजलं पाहिजे. तसंच महाराष्ट्रातल्या रुग्णालयांसाठी सरकारने एक नियमावली जाहीर करावी अशीही आमची मागणी आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 08/04/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शुक्रवारी विशाल नगर, पिंपळे निलख येथील नागरिकांचा हंडा मोर्चा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : मागील दोन महिन्यापासून पिंपळे निलख, विशाल नगर, वाकड भागात कमी दाबाने व अवेळी पाणीपुरवठा होत आहे. या परिसरात जवळपास ४० हजार लोकवस्ती, हजारो दुकाने व व्यवसायिक आस्थापना आहेत. मोठ्या प्रमाणात सोसायटी परिसर आहे. मागील सहा वर्षांपूर्वी तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिवसाआड पाणीपुरवठा देण्याचे धोरण शहरभर सुरू केले होते. तेव्हापासून या परिसरात अनेकदा पाणीपुरवठा कमी दाबाने व अवेळी करण्यात येतो. या परिसरातील नागरिक नियमितपणे महानगरपालिकेचा मिळकत कर व पाणीपट्टी कर भरतात. येथील पाणीपुरवठ्याबाबत अधिकारी व कर्मचारी उदासीन आहेत.

मागील दोन महिन्यांपासून या परिसरातील सोसायटी धारकांनी लाखो रुपये खर्च करून टँकरने पाणी घेतले आहे. या प्रदूषित पाण्यामुळे येथे रोगराई वाढण्याची शक्यता आहे पुढील चार दिवसात पाणीपुरवठा सुरळीत करावा अन्यथा "ड"प्रभाग क्षेत्रिय कार्यालयावर शुक्रवारी (दि. ११) शेकडो महिला भगिनींचा हंडा मोर्चा काढून प्रभागातील अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात येईल असा इशारा भाजपाचे ज्येष्ठ नेते सचिन साठे यांनी दिला आहे.



# तनिषा भिसे यांच्या मृत्यूच्या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये - निखिल दळवी

## धर्मदाय आयुक्तांकडे केली शहरातील सर्व रुग्णालयांच्या चौकशीची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




पिंपरी चिंचवड : दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या आडमुठेपणामुळे तनिषा भिसे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला धर्मदाय रुग्णालय असूनही तनिषा भिसे यांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपये अनामत रक्कम भरण्यास सांगितली होती, न भरल्याने पैशाअभावी ही दुर्दैवी घटना घडली. अशी घटना यापुढे घडू नये, या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी धर्मदाय आयुक्त यांनी पिंपरी चिंचवड शहरातील सर्व धर्मदाय रुग्णालय यांची चौकशी करून अशा रुग्णालयावर कारवाई करावी, अशी मागणी शिवसेनेचे युवा शहर प्रमुख तथा विठ्ठल प्रतिष्ठानचे अध्यक्ष निखिल दळवी यांनी धर्मदाय आयुक्त पुणे विभाग यांच्याकडे केली आहे.

पिंपरी चिंचवड शहरांमधील सर्व धर्मदाय रुग्णालयांची चौकशी करून नियम व अटींचे पालन न करणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात यावी, असे त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य सरकार यांच्या मार्फत धर्मादाय रुग्णालय यांना निर्धन व दुर्बल घटकांसाठी सर्व धर्मदाय रुग्णालयांमध्ये रुग्णालय क्षमतेच्या ( निर्धन घटकासाठी ) 10 टक्के खाटा (बेड ) व (दुर्बल घटकांसाठी) 10 टक्के खाटा (बेड) हे राखीव ठेवावे त असा नियम आहे व रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात निर्धन व दुर्बल घटकांचे इलाज करावेत असे बंधन धर्मदाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडून घालण्यात आले आहे तरी देखील पिंपरी चिंचवड मधील सर्व धर्मादाय रुग्णालयांमध्ये गोरगरीब निर्धन व दुर्बल घटकांचे कोणतेही इलाज मोफत व सवलतीच्या दरात केले जात नाही सर्व पिंपरी चिंचवड शहरा मधील धर्मादाय रुग्णालयाने धंदा मांडला आहे धर्मादाय आयुक्त यांनी दिलेल्या अटी व शर्तीचे नियमाचे पालन या धर्मादाय रुग्णालयान कडून करण्यात येत नाही पिंपरी चिंचवड शहर मधील सर्व धर्मादाय रुग्णालये सर्व रुग्णांकडून पैसे वसूल करून त्यांचे इलाज केले जातात कोणालाही मोफत किंवा सवलतीच्या दरात इलाज पिंपरी चिंचवड शहरा मधील कोणत्याही धर्मादाय रुग्णालयांमध्ये मिळत नाहीत सर्व धर्मादाय रुग्णालयांची मजुरी मोठ्या प्रमाणात वाढली आहे

पिंपरी चिंचवड शहरा मधील धर्मादाय रुग्णालयांमध्ये येणारे अनुभव व त्यांच्या विरोधातील तक्रारी खालील प्रमाणे

१) धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन व दुर्बल घटकांसाठी मोफत व सवलतीच्या दरात इलाज केले जातात असा बोर्ड प्रमुख दिसला अशा ठिकाणी लावत नाही दिसणार नाही अशा ठिकाणी लपून लावतात जेणेकरून नागरिकांच्या निदर्शनास येणार नाही

२) धर्मादाय रुग्णालयाकडे निर्धन व दुर्बल घटकांच्या धर्मादाय योजनेमध्ये इलाज करायचा आहे अशी मागणी धर्मादाय रुग्णालयाकडे केली असता खाट ( बेड) अवेलेबल नाही जागा नाही अशी सर्व उत्तरे मिळतात रुग्णालयाकडून दिली जातात

३) धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन व दुर्बल घटकांसाठी मोफत व सवलतीच्या दरात इलाज करण्यासाठी दहा टक्के खाटा (बेड) राखीव ठेवणे बंधनकारक आहे हॉस्पिटलमध्ये गेल्या असतात कोणतेही खाट (बेड )अवेलेबल राखीव ठेवण्यात आलेली नाही असे आमच्या निदर्शनास आले आहे निर्धन व दुर्बल घटकांकरता मोफत व सवलतीच्या दरात खाटा राखीव ठेवण्यात येत नाही

४) धर्मादाय रुग्णालयामध्ये रुग्णाला ऍडमिट करण्यासाठी अनामत रक्कम घेतल्याशिवाय ऍडमिट केले जात नाही हाकलून दिले जाते पैसे नाही तर सरकारी दवाखान्यात जावा असे सल्ले दिले जातात

५) धर्मादाय रुग्णालया ने निर्धन व दुर्बल घटका मध्ये रुग्णांना सवलतीच्या दरात व मोफत किती रुग्णांचे इलाज केले याची माहिती धर्मादाय आयुक्त साहेब यांनी दर महिन्याला मागितली पाहिजे जेणेकरून धर्मदाय रुग्णालय निर्धन व दुर्बल घटकांचे इलाज मोफत व सवलतीच्या दारात करत आहे का नाही याची माहिती मिळेल व करत नसतील तर त्यांचा परवाना रद्द करावा रुग्णालय ताब्यात घ्यावे

६) धर्मादाय रुग्णालयांमध्ये निर्धन व दुर्बल घटकांचे रुग्ण गेले असता आमच्या रुग्णालयामध्ये कोणत्याही योजना उपलब्ध नाही कोणत्याही योजनेमध्ये इलाज मिळणार नाही असे सांगण्यात येते

७) पिंपरी-चिंचवड शहरांमधील सर्व धर्मादाय रुग्णालयामध्ये महाराष्ट्र राज्य सरकार यांच्याकडून दोन प्रतिनिधी परमनंटली प्रत्येक रुग्णालयात बसवावे रुग्णालयावर देखरेख करण्यासाठी त्यांची नियुक्ती करावी जेणेकरून धर्मदाय रुग्णालय निर्धन व दुर्बल घटकांसाठी इलाज सवलतींच्या दरामध्ये व मोफत करत आहे का याच्यावर लक्ष ठेवता येईल

वरील सांगितलेल्या सर्व तक्रारींची गंभीर दखल घेऊन सर्व पिंपरी चिंचवड मधील धर्मादाय रुग्णालयांची चौकशी करून त्यांच्यावरती कठोरात कठोर कारवाई करावी व इथून पुढे पिंपरी चिंचवड मधील सर्व धर्मादाय रुग्णालयान मध्ये निर्धन व दुर्बल घटकांना मोफत व सवलतीच्या दरात इलाज मिळावा, असे त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. तसेच सदरची निवेदन निखिल दळवी यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे याचबरोबर आरोग्य मंत्री प्रकाशआबिटकर व महाराष्ट्र राज्याचे धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती यांनाही दिले आहे.

# खून करून त्याच्या शरीराचे तुकडे केल्याचा धक्कादायक प्रकार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी :भोसरी येथून चार दिवसांपासून बेपत्ता असलेल्या जेसीबीचालकाचा खून करून त्याच्या शरीराचे पाच तुकडे केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आरोपींनी मृतदेहाचे पाच तुकडे करून ठिकठिकाणी फेकून दिले. त्याचे धड मोशी येथील खाणीत आढळून आल्याने खुनाचा उलगडा झाला. सिद्धाराम प्रभू ढाले (वय ४५, रा. गव्हाणे वस्ती, भोसरी) असे खून झालेल्या जेसीबीचालकाचे नाव आहे. सिद्धाराम यांच्या पत्नीने दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिद्धाराम हे जेसीबीवर चालक म्हणून काम करीत असत. २९ मार्च रोजी सिद्धाराम सकाळी घरातून कामासाठी बाहेर पडले. ते परत आले




नाहीत. कुटुंबीयांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला. मात्र, ते सापडत नसल्याने ३१ मार्च रोजी भोसरी पोलीस ठाण्यात सिद्धाराम यांची बेपत्ता झाल्याची तक्रार त्यांच्या पत्नीने दिली.

त्यानंतर पोलिसांनी शोध सुरू केला. २ एप्रिल रोजी दुपारी चारच्या सुमारास मोशी येथील कानिफनाथ मंदिरासमोरील खडी मशिन खाणीमध्ये स्थानिकांना सिद्धाराम यांचा मृतदेह आढळला.

त्यांनी तत्काळ पोलिसांना हा प्रकार कळविला.

# श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्यावर शेतकरी पॅनेलचे वर्चस्व

## संस्थापक नानासाहेब नवलेंसह दत्तात्रय जाधव, चेतन भुजबळ विजयी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मावळ : श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत अखेर सर्वपक्षीय श्री संत तुकाराम शेतकरी विकास पॅनेलने मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय • अधिकारी मुकुंद पवार यांनी दिली.१८ जागा बिनविरोध कारखान्याच्या

संचालक मंडळातील एकूण २१ पैकी १८ जागा बिनविरोध झाल्या होत्या. तर, केवळ हिंजवडी-ताथवडे गटातील तीन जागांसाठी चार उमेदवार रिंगणात असल्याने निवडणूक लागली होती. या गटात




संत तुकाराम शेतकरी विकास पॅनेलचे उमेदवार नानासाहेब नवले, दत्तात्रय जाधव, चेतन भुजबळ व अपक्ष उमेदवार बाळासाहेब भिंताडे यांच्यात लढत झाली.

शनिवारी झालेल्या मतदान प्रक्रियेत २२,२५८ मतदारांपैकी ९,५४६ मतदारांनी आपला मतदानाचा हक बजावला होता. दत्तात्रय जाधव आज वाकड येथील द्रोपदा लॉन्स येथे तीन फेऱ्यांत मतमोजणी पार पडली. २० टेबल्सवर ४० कर्मचारी तैनात करण्यात आले होते. निवडणूक निर्णय अधिकारी मुकुंद पवार यांनी दुपारी साडेबारा वाजता अधिकृत निकाल जाहीर केला. यामध्ये नवले यांना ८ हजार ५२४ मते मिळाली. जाधव यांना ८ हजार ३८० मते तर चेतन भुजबळ यांना ७ हजार १८९ मते मिळाली. दरम्यान, अपक्ष उमेदवार भिंताडे यांना २ हजार ५०५ मते मिळाल्याने त्यांच्या मोठ्या फरकाने पराभव झाला.

**संत तुकाराम शेतकरी विकास पॅनेलचे विजयी उमेदवार**

१. गट क्रमांक १ हिंजवडी ताथवडे नानासाहेब नवले (८५२४ मते), दत्तात्रय जाधव (८३८०), चेतन भुजबळ (७१८९) २. गट क्रमांक २ पौड-पिरंगुट धैर्यशील ढमाले, यशवंत गायकवाड. दत्तात्रय उभे ३.गट क्रमांक ३ तळेगाव-वडगाव : बापूसाहेब भेगडे, माऊली दाभाडे, संदीप काशीद ४. गट क्रमांक ४ सोमाटणे-पवनानगर: छबुराव कडू, भरत लिमन, उमेश बोडके ५.गट क्रमांक ५ खेड-शिरूर हवेली: अनिल लोखंडे, विलास कातोरे, अतुल काळजे, धोंडीबा भोंडवे ६. महिला राखीव : ज्योती आरगडे, शोभा वाघोले ७. अनुसूचित जाती/जमाती : लक्ष्मण भालेराव ८. इतर मागासवर्ग : राजेंद्र कुदळे ९. विमुक्त जाती/भटक्या जमाती : शिवाजी कोळेकर

# पुणे शहरासह जिल्ह्यात उन्हाचा तडाखा वाढणार

पुणे शहरासह जिल्ह्यातील कमाल तापमानात वाढ झाल्याने उष्णतेचा पारा पुन्हा ४१ अंशांच्या पुढे पोहोचला आहे. परिणामी, रविवारी (दि. ६) शहरात उन्हाचा चटका आणि उकाडा चांगलाच वाढला होता. पाषाण येथे सर्वाधिक ४१.५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली असून, पढाल दोन दिवस शहरासह जिल्ह्यातील कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता पुणे वेधशाळेने वर्तविली आहे.

उत्तर दक्षिण वाऱ्याची द्रोणीय रेषा मराठवाड्यापासून दक्षिण तमिळनाडूपर्यंत जात आहे, तर एक वाऱ्याची द्रोणीय रेषा पूर्ण विदर्भापासून पूर्व बिहारपर्यंत जात आहे. त्यामुळे पुढील चार दिवस महाराष्ट्रात हवामान कोरडे राहील, तर कमाल तापमानात दोन ते चार अंशांनी वाढ होण्याची शक्यता आहे. परिणामी, काही जिल्ह्यांमध्ये उष्ण व दमट हवामान राहील. गुरुवारी विदर्भात मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यासह पाऊस पडेल, असा अंदाज आहे.राज्यातील हवामान बदलाचा परिणाम पुणे शहर आणि जिल्ह्यातही होणार असून, पुढील तीन दिवस कमाल तापमानात वाढ होणार असल्याने उन्हाचा चटका वाढणार आहे.

त्यामुळे दिवसा हवामान कोरडेआणि आकाश निरभ्र राहील.. पुढील तीन



दिवस दुपारनंतर ढगाळ वातावरण राहील, असा अंदाज पुणे वेधशाळेने वर्तविला आहे.शहरातील पाषाण परिसर पाठोपाठ राजगुरुनगर येथे ४०.५, कोरेगाव पार्क ४०.२, तळेगाव ढमढेरे परिसरात ४०, शिरूर ३९.६, शिवाजीनगर ३९.२, चिंचवड ३८.९, हडपसर ३८.६, वडगाव शेरी ३८.४, मगरपट्टा ३८.२, एनडीए ३७.६, हवेली ३६.७ अंश सेल्सिअस कमाल तपामानाची नोंद झाली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 08/04/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# बारामतीकरांना माझ्यासारखा आमदार मिळणार नाही - अजित पवार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बारामतीकरांना माझ्यासारखा आमदार मिळणार नाही. तुम्ही या विधानसभा मतदारसंघाचा १९५२ न पासूनचा इतिहास बघा. माझ्याएवढे काम आजवर कोणाचेच नाही, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले रविवारी येथे एका कार्यक्रमात ते बोलत होते , तुम्ही १९९२ पासून - प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रत्येक आमदाराचीकारकीर्द बघा आणि माझी कारकीर्द बघा. माझ्याएवढे काम करणारा आमदार तुम्हाला परत मिळणार नाही. त्यांनी त्यांच्या त्यांच्या कारकिर्दीत काय काम केले आणि तुम्ही १९९१ पासून मला संधी दिल्यावर मी काय काम केले, हे तुमच्यासमोर आहे. बारामतीत जेवढे काम मी केले तेवढे करणारा एकही आमदार तुम्हाला इथून पुढे मिळणार नाही. मी एवढ्यावरच थांबणार नाही. तुम्ही मला या वेळीही प्रचंड मतांनी निवडून दिले आहे.

त्यामुळे मागील काळात झाले नाही, एवढे काम मी या पाच वर्षांत करणार आहे.

अजित पवार यांच्यापूर्वी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व शरद पवार हे करत होते. त्यामुळे उपमुख्यमंत्र्यांच्या या विधानातून त्यांनी काकांवर निशाणा साधल्याचे बोलले जात आहे.



# विशाल वाकडकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम यशस्वी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड, – सामाजिक बांधिलकी आणि लोकसंपर्क वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने युवा नेते विशाल वाकडकर (प्रदेश उपाध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस महाराष्ट्र राज्य) यांच्या ३ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या वाढदिवसानिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



२ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता दापोडी येथील सरस्वती अनाथ आश्रमातील मुलांना शैक्षणिक साहित्य आणि फळे वाटप करण्यात आले. अजय कांबळे आणि त्यांच्या मित्रपरिवाराच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. त्याच दिवशी दुपारी २ वाजता वाकड येथे बांधकाम कामगारांना शिधा वाटप करण्यात आले.

३ एप्रिल रोजी सकाळी १०:३० वाजता वाकड येथील वाकडकर वस्ती येथे नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जवळपास ३५० नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तसेच २३ रुग्णांचे मोतीबिंदू ऑपरेशन मोफत करण्यात येणार आहे. याशिवाय १२० पेक्षा अधिक नागरिकांची रक्तदाब, कॅल्शियम आणि C B C तपासणी करण्यात आली.

त्याच दिवशी दुपारी २ वाजता वाय. सी. एम. रुग्णालय, पिंपरी येथे रुग्णांना फळे वाटप करण्यात आली. संध्याकाळी ४ वाजता यमुनानगर, निगडी येथील अपंग पुनर्वसन केंद्रातील मुलांना शैक्षणिक साहित्य आणि फळे वाटप करण्यात आले. यावेळी केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला.

४ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता मातृछाया बालकाश्रम, दिघी येथे मुलांना शैक्षणिक साहित्य आणि स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन मंगेश असवले आणि त्यांच्या मित्रपरिवाराच्या माध्यमातून करण्यात आले.

या उपक्रमांच्या पुढील टप्प्यात, १३ एप्रिल २०२५ रोजी दिघी येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याचेही आयोजन मंगेश असवले आणि मित्रपरिवार यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

या सर्व उपक्रमांमुळे सामाजिक जाणीवा अधिक दृढ झाल्या असून, विविध समाजघटकांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. आयोजकांनी यापुढेही समाजोपयोगी उपक्रम राबवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# गरजू रुग्णांसाठी महापौर निधी पुन्हा सुरु करावे - डॉ.सतिश दत्तात्रय कांबळे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवडमधील गोर-गरीब रुग्णांसाठी ‘महापौर निधी’ पुन्हा सुरु करण्याबाबत चे निवेदन शरद पवार संजीवनी आरोग्य मित्र संस्थेचे राज्यप्रमुख डॉ. सतिश दत्तात्रय कांबळे यांनी "ई-मेल च्या माध्यमातून पिंपरी चिंचवड महानगर पालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे. या निवेदनात डॉ. सतिश दत्तात्रय कांबळे यांनी नामूदकेले आहे कि,पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेअंतर्गत गरजू व



आर्थिक दृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी पूर्वी महापौर निधी दिला जात होता. या निधीतून हृदय शस्त्रक्रिया, मूत्रपिंड प्रत्यारोपण, डायालिसिस, कर्करोग इत्यादी गंभीर आजारांवरील उपचारांसाठी गरजूंना मदत केली जात होती. मात्र, गेल्या काही वर्षांपासून महापौर निधी पूर्णतः बंद आहे. २०१९ पासून महापौर नसल्यामुळे आपल्यामार्फतच महापालिकेचे सर्व प्रशासकीय निर्णय घेतले जात आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत महापौर निधीचा लाभ थांबवण्यात आला असून, याचा थेट परिणाम गोरगरीब रुग्णांवर होत आहे. अनेक रुग्ण आर्थिक मदतीअभावी वेगवेगळ्या सामाजिक संस्थेकडे निधीसाठी धाव घेत आहेत व योग्य वेळी उपचार न मिळाल्यामुळे अडचणीत येत आहेत. पैसेअभावी रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तरी, मानवतेच्या दृष्टीकोनातून आणि सामाजिक बांधिलकीतून या निधीचे लेखापरीक्षण लवकरात लवकर पूर्ण करून गरजू रुग्णांसाठी महापौर निधी पुन्हा सुरुवात करावे. प्रशासनाने या निधीच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक ती कार्यवाही करून गोरगरीब जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी या निवेदनात केली गेली आहे

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968